# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २८३- २३** **दिनांक : - २५/०८/२०२३**

## मोटार सायकल चोरी करणाऱ्या साराईत गुन्हेगाराला अटक करण्यास आचोळे पोलीसांना यश

आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक ३०/०७/२०२३ रोजी रात्रौ १०.०० वाजता ते दिनांक ३१/०७/२०२३ रोजीचे दुपारी १२.०० वाचे दरम्यान फिर्यादी नामे श्री दिपक जयप्रकाश विश्वकर्मा वय २५ वर्षे धंदा नोकरी रा.रुम नं. ०६,अंबावाडी चाळ, काजुपाडा, तुळीज रोड नालासोपारा पुर्व ता.वसई जि पालघर यांनी त्यांचे मालकीची मोटार सायकल क्रं. एम एच ४८ बी एन ८०४४ ही जिवदानी अपा. माऊली सर्वीसींग सेंटरच्या बाजुला, आचोळे गावं, नालासोपारा पुर्व येथे रोडवर उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे संमतीशिवय स्वत:च्या फायद्याकरीता लबाडीच्या इराद्याने चोरी करुन चोरुन नेहली बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आचोळे पोलीस ठाणे गु.र.नं- ३७२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे दिनांक दि.०४/०८/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वसई-नालासोपारा परीसरात तसेच आचोळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडत असल्याने व सदरचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत मा.वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार हे नमुद अज्ञात चोरट्याचा शोध घेत होते.

दिनांक २०/०८/२०२३ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार आचोळे पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हेगार वॉच पेट्रोलींग करीता फिरत होतो. दरम्यान पो.स्टे हद्दीमध्ये अलकापुरी बाजार पटांगण, मुख्य रोडवरुन चंदन नाका बाजुकडे एक इसम संशयीत ईसम त्याचे ताब्यातील एफ.झेड. मो.सा.क्र. एमएच ४८ बीएन ८०४४ हिचेवर जात असताना दिसुन आला. त्यास थांबवुन त्याचेकडे त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पवन अशोक मिश्रा ऊर्फ पवन गुरु वय-२९ वर्षे, रा. रुम नं. ६०३, बिल्डींग नं. ४, आय ॲव्हेन्यू, ग्लोबलसिटी, विरार पश्चिम ता.वसई, जि. पालघर मुळ रा. गाव बारीगाव हनुमान नगर, बारीगाव डिई, तहसिल मडीयांहू, जि.जौनपुर, राज्य-उत्तर प्रदेश असे सांगीतले. नमुद इसमाच्या कब्जात एकुण १२ दुचाकी (मोटार सायकल) वाहनाच्या चाव्या मिळुन आल्या तसेच दुचाकी एफ.झेड. मो.सा.क्र. एमएच ४८ बीएन ८०४४ बाबत विचारपुस करता त्याने उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याने त्यास पोलीस ठाण्यात आणुन सखोल विचारपुस करता सदरची मोटार सायकल ही काही दिवसापूर्वी आचोळे पोलीस ठाणे हद्दीतुन चोरी केल्याची तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हात वर नमुद आरोपीस अटक करण्यात आली.अटक आरोपीत यांचेकडे अधिक कौशल्यपुर्ण विचारपुस करुन सखोल

तपास केला असता त्यांचेकडुन एकुण ५ मोटार सायकली एकुण १,९०,०००/- रुपये किंमतीच्या हस्तगत करुन आयुक्तालयातील एकुण ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**- उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे | गु.र.नं- ३७२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |
| २. | वालीव पोलीस ठाणे | गु.र.नं- ५९३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |
| ३. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.नं- २९०/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे, |

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२ वसई, विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळासाहेब पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विवेक सोनवणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि.यशपाल सुर्यवंशी,पा.उप.नि.बुधंवत लोंढे, सुहास म्हात्रे, पो.हवा. दत्तात्रय दाईंगडे, शंकर शिंदे, प्रशांत सावदेकर, पो.अं.निखील चव्हाण, विनायक कचरे, आमोल सांगळे, मोहनदास बंडगर, बाळु अव्हाड, मोहन पाईकराव यांनी केली आहे.

---ooo---